आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
११ मार्च २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- एलपीजी गॅसच्या तुटवड्यावरून विरोधकांचा लोकसभेत गदारोळ

- प्रधानमंत्री आज केरळ आणि तामिळनाडूच्या दौऱ्यावर, एकंदर १६ हजार ४५० कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचं करणार लोकार्पण आणि पायाभरणी

- रिलायन्स उद्योगसमूह अमेरिकेतल्या ३०० अब्ज डॉलर्सच्या तेलशुद्धिकरण प्रकल्पात भागीदार

- १२ वर्ष कोमात राहिलेल्या रुग्णाची जीवरक्षक प्रणाली हटवण्याला सर्वोच्च न्यायालयाची परवानगी

**आणि**

- छत्तीसगडमध्ये १०८ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

**<><><><><>**

एलपीजी गॅसच्या तुटवड्यावरून विरोधकांनी आज लोकसभेत गदारोळ केल्यामुळे कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित झालं. सकाळी कामकाजाला सुरुवात होताच विरोधी पक्ष सदस्यांनी हौद्यात उतरून घोषणाबाजी करायला सुरुवात केली. विरोधकांच्या घोषणाबाजीतच पीठासीन अधिकारी दिलीप सैकिया यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. मात्र, तरीही विरोधकांचा गदारोळ सुरू राहिला. वारंवार विनंती करूनही गदारोळ सुरूच राहिल्यानं सैकिया यांनी कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब केलं.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रश्नोत्तराच्या तासात काही प्रश्नांची उत्तरं दिली. भारतातल्या इंटरनेट सेवांचे दर जगातले सर्वात स्वस्त आणि परवडणारे असल्याचं अश्विनी वैष्णव यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. गेल्या दशकात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने डिजिटल इंडिया उपक्रमाच्या माध्यमातून डिजिटल समावेशनाच्या तीन मुख्य आघाड्यांवर काम केलं आहे. इंटरनेट सुविधांची व्याप्ती वाढवणं, इंटरनेटचे परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणं आणि मजबूत डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांची निर्मिती यांचा त्यात समावेश असल्याचं वैष्णव म्हणाले. २०१४मध्ये इंटरनेटची

सुविधा फक्त २५ कोटी नागरिकांनाच मिळत होती आणि आज ही संख्या सुमारे १०३ कोटी इतकी वाढल्याचं अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याचं नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाने म्हटलं आहे. विमान कंपन्या बदलत्या परिस्थितीला प्रतिसाद म्हणून योग्य व्यवस्था करत आहेत, प्रवाशांची सुरक्षितता आणि सेवांचे सातत्य याला प्राधान्य असल्याचं मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलं आहे. असं एका निवेदनात, मंत्रालयाने म्हटलं आहे.

दरम्यान, होर्मुझच्या सामुद्रधुनीत इराणने केलेल्या कारवाईच्या वृत्तानंतर अमेरिकन सैन्याने स्फोटक सुरुंग तैनात करण्यासाठी वापरात येणाऱ्या १० इराणी युध्दनौका पूर्णपणे नष्ट केल्या असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. सर्वात महत्त्वाच्या ऊर्जा मार्गांपैकी एक असलेल्या धोरणात्मक जलमार्गावर इराण हल्ला करू शकेल या काळजीपोटी ही कारवाई केल्याचा दावा ट्रंप यांनी केला आहे.

देशात घरगुती वापराच्या वीज आणि इंधनाची कोणतीही टंचाई नाही, आणि नागरिकांनी घाबरण्याचं काहीही कारण नाही, असा स्पष्ट निर्वाळा काल केंद्र सरकारकडून देण्यात आला. उपलब्ध सर्व मार्गांनी इंधनाचा पुरवठा कायम राखण्यात येईल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी समाज माध्यामावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या संघर्षाचा परिणाम देशातल्या शेअर बाजारावर दिसून येत आहे. गुंतवणूकदारांनी सावध पवित्रा घेतल्याने मुंबई शेअर बाजाराचा निफ्टी आज दुपारच्या सत्रापर्यंत एक हजार ४५ अंकांनी म्हणजेच एक पूर्णांक ३ ३ शतांश टक्के घसरला, तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीने २९० अंकांची म्हणजे एक पूर्णांक १९ शतांश टक्के घसरण नोंदवली.

<><><><><>

केंद्र सरकारने मच्छिमार समाजासाठी विविध कल्याणकारी योजना राबवल्या आहेत असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कोच्ची इथं जाहीर कार्यक्रमात केलं. केरळचं

नामकरण केरळम करण्याचा निर्णय मल्ल्याळी भाषकांसाठी आनंददायी आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. धीवर सभा या मच्छिमार संघटनेनं हा कार्यक्रम आयोजित केला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज केरळ आणि तामिळनाडूच्या दौऱ्यावर आहेत. केरळमध्ये, एर्नाकुलम इथं एकंदर १० हजार ८०० कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी त्यांच्या हस्ते झाली. तमिळनाडूमध्ये, तिरुचिरापल्ली इथं एकंदर ५ हजार ६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचं ते उद्घाटन करतील. या प्रकल्पांमध्ये पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू पायाभूत सुविधा, ग्रामीण भागाला जोडणारे प्रकल्प आणि महामार्ग विकास यासारख्या प्रमुख क्षेत्रांचा समावेश आहे. पाच नवीन रेल्वे सेवांना प्रधानमंत्री हिरवा झेंडा दाखवतील.

**<><><><><>**

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना - डीआरडीओ आणि भारतीय नौदलाने संयुक्तपणे गोव्याच्या किनाऱ्यावर पीएटआय या संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या विमानातून हवेतून जहाजावर टाकण्यात येणाऱ्या कंटेनर एडीसी-१५० च्या चार यशस्वी इन-फ्लाइट चाचण्या घेतल्या. एकंदर १५० किलो वजनाचा माल वितरीत करण्यासाठी विकसित केलेले, एअर ड्रॉपेबल कंटेनर किनाऱ्यापासून दूर तैनात असलेल्या समुद्रात संकटात असलेल्या नौदल जहाजांना वेगाने रसद पोहोचवण्यासाठी तयार करण्यात आले आहेत. ही प्रणाली लवकरच भारतीय नौदलात समाविष्ट होण्याची अपेक्षा आहे. असं संरक्षण मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रिलायन्स उद्योग समूहासोबत सुमारे ३०० अब्ज अमेरिकन डॉलरची भागीदारी जाहीर केली आहे. या भागीदारीतून अमेरिकेतला पहिला तेलशुद्धीकरण कारखाना सुरु केला जाणार आहे. अमेरिकन ऊर्जा क्षेत्रातला हा ऐतिहासिक निर्णय असल्याचं ट्रम्प यांनी समाज माध्यमांवर म्हटलं आहे.

टेक्सास राज्यात ही रिफायनरी स्थापन केली जाणार असून त्यामुळे हजारो रोजगार उपलब्ध होण्याची अपेक्षा वर्तवण्यात आली आहे. ही जगातली सर्वात स्वच्छ रिफायनरी असेल आणि सध्याच्या इराण संघर्षाच्या काळात ती अमेरिकेची ऊर्जा बाजारपेठ स्थिर ठेवण्याचं काम करेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला आहे.

<><><><><>

गेली १२ वर्ष रुग्णशय्येवर कोमा स्थितीत असलेल्या ३२ वर्षीय इसमाला इच्छामरण देण्याची परवानगी आज सर्वोच्च न्यायालयानं दिली. रुग्णाच्या प्रकृतीत काहीही बदल होण्याची शक्यता नसल्याच्या कारणावरून रुग्णाच्या आईवडिलांनी इच्छामरणाबाबतची याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठानं हा ऐतिहासिक निर्णय दिला. जगण्याच्या हक्कात सन्मानाने जगणं असा अर्थ अभिप्रेत असल्याचं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं. रुग्णाची प्रतिष्ठा कायम ठेवून त्याची जीवरक्षक प्रणाली काढून घेण्याची प्रक्रिया राबवण्यात यावी, असे निर्देश खंडपीठानं दिले आहेत.

<><><><><>

छत्तीसगडच्या सहा जिल्ह्यांमधल्या १०८ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे. त्यांच्यावर सुमारे ३ कोटी ९५ लाख रुपयांचं एकत्रित बक्षीस होतं. केंद्रीय गृह मंत्रालयानं आज ही माहिती दिली. देश येत्या महिनाअखेरीपर्यंत नक्षलवादापासून मुक्त होईल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला आहे.

<><><><><>

महिला या फक्त शेती करत नाहीत, तर शेतीचं भविष्य घडवत आहेत. महिला शेतकरी समृद्ध झाल्या, तरच राज्य समृद्ध होईल, असं प्रतिपादन महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज केलं. आंतरराष्ट्रीय महिला दिन आणि संयुक्त राष्ट्र संघटनेनं जाहीर केलेल्या आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष २०२६च्या निमित्ताने मुंबई विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. राज्यात शेती कसणाऱ्या महिलांचं प्रमाण पुरुषांपेक्षा २० टक्क्यांनी जास्त असलं, तरी जमिनीचा सातबारा त्यांच्या नावावर नसल्यामुळे शेतीशी संबंधित विविध योजनांचे लाभ त्यांना मिळण्यात अडचणी येतात. त्या दूर करण्यासाठी राज्यात लिंगसमभाव संसाधन केंद्र सुरू करावं, अशी सूचना ज्येष्ठ कृषितज्ज्ञ नित्या राव यांनी या कार्यक्रमात केली. त्यानुसार असं केंद्र राज्य सरकार लवकरच सुरू करेल, असं आश्वासन सुनेत्रा पवार यांनी दिलं. महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी सरकार पुढच्या अधिवेशनात विशेष विधेयक आणेल, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रीय शैक्षणिक आणि संशोधन परिषद एनसीईआरटीने सर्व इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांचा आढावा घ्यावा असे निर्देश देण्यात आल्याची माहीती केंद्र सरकारने आज सर्वोच्च न्यायालयात दिली. एनसीईआरटीच्या आठव्या इयत्तेच्या सामाजिक शास्त्रे विषयाच्या पुस्तकात आक्षेपार्ह मजकूर छापल्याची स्वतःहून दखल घेऊन सर्वोच्च न्यायालयाने सुरु केलेल्या सुनावणीदरम्यान महाअधिवक्ता तुषार महेता यांनी ही माहिती दिली. या कामासाठी तज्ज्ञांची विशेष समिती नेमली जाईल असं त्यांनी सांगितलं.

//<><><><><>//